Lalita Gandbhir
4200 North Ocean Drive
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com
One Time Serial Rights

# ल्युसिफरची गोष्ट

एका संध्याकाळी आमच्या जेवणाच्या टेबलावर लहानशा, पारदर्शक बोलमध्ये शांतपणे पोहोणारे मासे प्रगट झाले. करंगळीएवढे ते सोनेरी, लाल मासे सूर्यप्रकाशात झळाळत होते. त्यांच्या रंगरूपावर मी भुलले म्हणा किंवा हे मासे कुत्र्या - मांजरांप्रमाणे घरभर हिंडणे, भुंकणे, म्यांव म्यांव करणे, चावणे, उड्या मारणे ह्यापैकी काही करणार नाहीत असा सुज्ञ विचार मी केला म्हणून म्हणा ! माझी परवानगी न घेता मासे आणण्याच्या रतीच्या (वय १५ वर्षे) प्रमादाला मी क्षमा केली.

पुढचे तीन महिने मासे व मी एकाच छपराखाली समांतर जीवन जगत राहिलो. तरीपण बोलमधल्या माशांची संख्या सोमवार ते शनिवारपर्यन्त कमी कमी होत जाते, हे माझ्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही. अक्षम्य हलगर्जीपणाने मी ह्या धोक्याच्या सूचनेकडे पूर्ण दुर्लक्ष केले.

एक शनिवारी रात्री अश्विन माझ्याकडे रडवेला चेहरा करून आला.

“माशांच्या बोलमधलं पाणी गढूळ झालंय. ते मरतील.”

“मेले तर मेले” हे जिभेवरचे उत्तर आवरून धरत मी म्हटलं,

“मग त्या माशांच्या आईला सांग.”

“ती गेलीय पार्टीला. उद्या येईल. तिने मला नोट दिली होती. पण ती हरवली.”

अश्विनचा चेहरा आणखीनच रडवा झाला.

मी बोलकडे दृष्टिक्षेप केला. खरंच ! माशांचे पाणी फार गढूळ झाले होते. मासे जेमतेम दिसत होते.

“मी हे पाणी ओतून त्यात नवे पाणी घालते.” मी सुचवले.

“तसं नाही. नळाचं पाणी घातलं तर माशांना शॉक बसतो. पाणी रूम टेंपरेचरला आणायला हवं.” अश्विन माझ्या अज्ञानाची कीव करत म्हणाला.

“मग मी पाणी थोडं गरम करते.” मी म्हटले.

पाणी रूम टेंपरेचरला कधी पोहोचेल ह्याविषयी अश्विनच व माझं एक मत होईना. बराच वेळ गरम थंड पाणी मिसळून बोटांच्या थर्मामिटरने पाण्याचे तपमान मोजून आम्ही रूम टेंपरेचरचं पाणी एका जगमध्ये तयार केले.

अश्विनने मग ते फडफडणारे मासे एका गाळणीवजा जाळीत पकडले आणि मी चटकन गढूळ पाणी ओतून नव्या पाण्याने बोल भरला. अश्विनने मासे परत बोलमध्ये घातले.

थोड्या वेळाने रडवेल्या तोंडाने अश्विन परत आला.

“आता काय झालं ?”

“ड्रॉप्स सापडत नाहीत !”

“ड्रॉप्स ?”

“पाण्यात घालायचे ड्रॉप्स. ते घातले की पी. एच. बरोबर होतो. ह्या पी. एच ला मासे मारतील.”

थोडक्यात अॅसिड रेनची भानगड अगदी आमच्या घरी पोहोचली होती.

रतीचा बंद दरवाजा ढकलून स्केट्स, पुस्तके, कपडे, रेकॉर्डस् इत्यादींच्या अडथळ्यातून आम्ही ड्रॉप्सच्या बाटलीच्या उत्खननास प्रारंभ केला.

रतीने आपल्या खोलीत फर्निचर विचित्र रीत्या मांडले होते, उशीची बाजू एका कोपऱ्यात येईल असा पलंग मांडून तिने भिंतीशी त्रिकोण साधला होता. त्रिकोणाची तिसरी बाजू आपले डेस्क लावून बंद केली होती. भिंतीलगत निर्माण झालेल्या पोकळीत पलंगावरून उडी मारूनच जाता येत होते. रती पुष्कळदा त्या जागेत बसून अभ्यास करत असे. आम्ही लहानपणी ‘घर घर’ खेळताना टेबल खुर्च्या हलवून अशीच जागा निर्माण करत असू.

“पंधरा वर्षाच्या मुलीने हा काय खुळेपणा लावलाय?” असा प्रश्न माझ्या मनाला चाटून गेला होता. पण टीनएजर्समध्ये असे काही करण्याची साथ आली असेल म्हणून रतीच्या ह्या मामुली विचित्रपणाकडे मी कानाडोळा केला होता.

रतीच्या डेस्कचे उत्खनन करताना मला खोलीच्या कोपऱ्यातून येणारी एक प्रकाशाची तिरीप दिसली.

कुतूहल जागृत होऊन मी अश्विनला म्हटले, “अश्विन, तिनं खोलीच्या कोपऱ्यात दिवा कशाला लावलाय?”

डिटेक्टिव्हच्या उत्साहाने अश्विनने पलंगावरून उडी मारली. कोपऱ्यात वळून त्याने काही बघितले आणि त्याच्या तोंडून "मॉम" एवढाच शब्द निसटला.

मी त्याच्याकडे बघितले तेव्हा त्याचे डोळे बशीएवढे गोल झालेले आणि त्याच्या तोंडाचा पीनट कार्टूनसारखा 'ओ' झाला होता. माझ्या मेंदूत तत्काळ धोक्याचा लाल कंदील पेटला.

"अश्विन, काय आहे तिथं ?" मी दरडावुन विचारले.

"मी नाही सांगणार" म्हणत अश्विन पलंगावरून उडी मारून निसटला.

मी त्याच्या पाठोपाठ जाऊन अक्षरशः त्याचा शर्ट गळ्याजवळ धरला.

"काय आहे सांग !"

पण तो तोंडातून काही शब्द काढेल तर शपथ.

"नको सांगूस, मी बघीन" म्हणत मी उलटी फिरले.

दोन पावलांवर माझे अवसान ओसरले.

वळून बघितले तर अश्विन माझ्याकडे मिस्किलपणे बघत होता. कार्टं आपल्या आईला चांगलं ओळखतं !

"काय ते सांग, नाहीतर मी शेजारच्या बॉबला बोलावून घेऊन काय आहे ते फेकून देईन."

हा बाण वर्मी लागला.

"तिथे काचेचा बॉक्स आहे ना, त्यात -" अश्विन अडखळला.

"त्यात काय आहे ? सांग"

"त्यात साप आहे."

मी मोठ्यांदा किंचाळले, "काय ? साप ?"

"हो, साप."

मी घाईबाईने रतीच्या खोलीचा दरवाजा घट्ट बंद केला.

"उजेड कसला येतोय ?"

"सापाच्या बॉक्स मध्ये रतीने दिवा लावलाय. त्याला उब द्यायला असेल."

"बॉक्सवर काय आहे ?"

"गोधडी."

"गोधडी !" मी परत किंचाळले.

खाडकन् माझी ट्यूब पेटली. मासे हे सापासाठी रतीने खरीदलेले खाद्यपदार्थ होते. ते लाल, सोनेरी सुंदर मासे रती निर्दयपणे सापाला खायला घालत होती.

एव्हाना सासूबाई तिथे येऊन पोहोचल्या. त्यांनी सर्व हकीकत ऐकताच आपल्या बेडरूममध्ये जाऊन दरवाजा बंद करून घेतला. माझ्या मनात संताप व भीतीचा डोंब उठला. रती ! नतद्रष्ट कार्टी कुठे गेली होती याचा फोनाफोनी करून शोध लागेना. आणि शरद गावाला गेला होता. काही बाप भाग्यवान असतात. घरात जेव्हा आणीबाणीची परिस्थिती निर्माण होते तेव्हा ते अनुपस्थित असतात.

आता साप व मासे ह्यांच्या संगतीत रात्र एका छपराखाली काढण्याशिवाय इलाज नव्हता.

"तो साप खूप दिवस रतीने खोलीत ठेवला असणार. आता तुला कळलं म्हणून तू उगाच काळजी करते आहेस." अश्विनने माझ्या जखमेवर मीठ चोळले. त्या रात्री आम्ही दरवाजे घट्ट बंद करून झोपलो.

"सारखं फूं फूं ऐकू येत होतं मला रात्रभर."

सकाळी सासूबाई म्हणाल्या

"भारतातल्या सापासारखे हे साप फूं फूं करत नसतात."

माझी खात्री नव्हती तरी मी ठोकून दिलं.

मग मलाही सबंध सकाळ फूं फूं असे फूत्कार ऐकू येऊ लागले.

बारा वाजता रती आणि शरद एकदम उगवले.

रतीला खाऊ का गिळू असे मला झाले होते. महाकालीचा अवतार धारण करण्याचे ठरवून मी दरवाजा उघडला. माझ्या मागे अश्विन पुढचा तमाशा बघण्यासाठी उत्सुकतेने उभा होता.

"ह्या कार्टीने घरात साप आणून ठेवलाय."

"साप ? कुठे आहे ?"

हातातली बॅग टाकून शरद उत्सुकतेने रतीच्या खोलीत शिरला. त्याच्यामागे रती व अश्विन गेले. मोठ्या प्रेमाने ते वळवळणारे जनावर उचलून शरद लिव्हींगरुममध्ये आला.

तो दोन वितीचा काळा, तपकिरी अन् पिवळा साप बघून मी मोठ्या मुष्किलीने किंचाळी दाबली आणि सगळे धैर्य एकवटून लिव्हींगरुममध्येच ठाम उभे राहिले.

“डॅडी, आहे का नाही क्यूट माझा ल्युसिफर ? ममी रागवतेय. पण घेऊ ना ठेवून ?”

“घेऊ ना ठेवून ! ठेवलाच आहे घरात मला न विचारता !” मी म्हटलं.

“तेच सांगतेय ! तीन महिने ल्युसिफर माझ्या खोलीत राहतो आहे. तुला पत्ताही नव्हता. तुला काय त्रास होणार आहे सापाचा !”

“तो आहे ही धास्तीच मला त्रासाची आहे.” मी म्हटले.

“ममी प्लीज ठेवून घे ना ल्युसिफरला” अश्विनने विनवण्या सुरु केल्या.

“शरद …” मी शरदकडे बघितले, तर तो ल्युसिफरमध्ये पूर्ण गुंतला होता. मुलांना शिस्त लावायला आईबाप एकमताने असावे लागतात. इकडे आमचे प्राण्यांवरून सतत दुमत. नव्हे, बाप उघड मुलांच्या बाजूला. माझं काय चालणार ?

“तुम्हाला हवं ते करा. पण मी सापाचं काही करणार नाही.” अशी धमकी देऊन मी तावातावाने स्वयंपाकघरात निघून गेले.

लगेच रतीने तिच्या बेडरूममधले सामान सरकवल्याचे आवाज येऊ लागले.

मी माशांकडे दृष्टीक्षेप केला. ते आरामात पोहत होते. ॲसेडिक तळ्यातच बहुधा त्यांचा जन्म झाला असावा.

दुपारी तो साप सबंध मासा कसा गिळतो, मग त्याचे पोट फुगत जाते याचे प्रात्यक्षिक झाले.

आता साप राजरोसपणे सगळ्यांच्या अंगाखांद्यावर घरात वावरू लागला. मला आणि सासूबाईंना त्याची सवय पण झाली.

असाच महिना गेला.

एका दुपारी रतीने जाहीर केले. “ल्युसिफर आजारी आहे.”

“टायलनॉल” अश्विनने सब दुखोंकी एक दवा ताबडतोब सुचवली.

“तुला कसं कळलं ?” मी विचारले.

“साप तिच्या कानात कुजबुजला.” इति शरद.

“तो सुस्त पडून राहतो.”

“एवढासा जीव ! रोज एक कच्चा मासा गिळतो. अजीर्ण झालं असेल. एरंडेलचे थेम्ब घाल.” मी आजोबांचा रामबाण उपाय सांगितला.

“त्याने खाणंच बंद केलंय.” रती म्हणाली.

“न्यूमोनिया झाला असेल.” शरदने निदान केले.

“त्याचं टेंपरेचर घे. तोंडात थर्मामिटर घालून आणि पेनिसिलीन दे.” मी म्हटले.

“थट्टेची गोष्ट नाही ही.” रती भडकली.

माझे वैद्यकीय ज्ञान अगदी निरुपयोगी असा निर्णय घेऊन रतीने दोन तीन फोन केले.

पुढचे तीन - चार दिवस सापाला ऊब मिळावी म्हणून ती त्याला स्वतःच्या खिशात घालून हिंडत होती. ज्या पेट स्टोअरमधून तिने त्याला विकत घेतले तिथे जाऊन तिने एक मलमाची डबी आणली. ती ते सापाला दिवसातून तीन वेळा चाळू लागली.

“मम्मी, साप औषध तोंडाने घेत नाही. त्याच्या अंगाला चोळावं लागतं. त्याची चामडी औषधाचं शोषण करते.”

“काय माझं हे गहन अज्ञान !” मी विचार केला.

रतीच्या खिशाच्या उबेने आणि मलमाच्या उपचाराने ल्युसिफरने आपले उपोषण सोडले नाही म्हणून रती ल्युसिफरला व्हेटरनरी हॉस्पिटलात घेऊन गेली. तिथे ॲडमिटिंगमधल्या बाईने रतीला प्रश्न विचारायला सुरवात केली.

“तुझं पेट कुठल्या रंगाचं आहे ?”

“तपकिरी, पिवळं अन् काळं.”

“खरंच ! तू इथे आणलंयस ?”

“आणलंय ना !” रतीने खिशातल्या ल्युसिफरला काढून त्या बाईसमोर धरला.

ती बाई मोठ्यांदा ओरडून पळाली. ती पळाली म्हणून आसपासचे लोक पळाले. लगतच्या वेटिंग रूममधल्या पेशंटचे मालकही एका कोपऱ्यात रतीपासून दूर जाण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांच्याबरोबरच्या कुत्री,

मांजरी इत्यादी पेशंट्सना मात्र ल्युसिफरमध्ये जबरदस्त कुतूहल निर्माण झाले. त्यांनी भो भो, म्यांव म्यांव करून आपले कुतूहल व्यक्त केले. दोन मांजरी मिशा फेंदारून आपल्या जातीवर गेल्या.

ह्या सगळ्या हल्ल्यागुल्ल्याचे कारण रतीच्या लक्षात येताच तिने ल्युसिफरला खिशाच्या बुरख्यात लपवला. तोपर्यंत व्हेट तिथे येऊन पोहचला होता. गोंधळाचे कारण उलगडताच तो म्हणाला,

"चल मी तुझ्या पेटला लगेच तपासतो."

ल्युसिफरच्या प्रभावाने रतीला वेटिंगरूममध्ये थांबावे लागले नाही.

गंभीर चेहऱ्याने पाच मिनिटे ल्युसिफरची तपासणी करून तो म्हणाला, "हे साधंसुधं काम नाही. ह्याला स्पेशालिस्टची जरुरी आहे."

त्याने दुसऱ्या दिवशी ल्युसिफरला स्पेशालिस्टची अपॉइंटमेंट दिली.

रती घरी आल्यावर "आपल्या ब्लूक्रॉस ब्यू शील्डमध्ये ल्युसिफरचा सामावेश नाही" असे जिभेवरचे तिखट शब्द मी रतीचे तोंड बघून परतवले.

दुसऱ्या दिवशी रतीचा हॉस्पिटलातून फोन आला.

स्पेशालिस्ट म्हणतोय "ल्युसिफरला ॲडमिट करायला हवं. इन्व्हेस्टिगेशन्स करायला हव्यात."

शरदने फोन घेतल्याने पैशाविषयी बोलणे व्यर्थ होते.

चोवीस तासांनी डॉ. ब्राऊनचा स्वतःचा फोन आला. त्याने रतीला फोन केला होता. फोन ठेवून अश्रू गाळत रती आमच्याकडे आली.

ल्युसिफरला ल्युकिमिया झालाय. किमोथेरपी दिली तर वीस टक्के रेमिशनमध्ये जाण्याचा चान्स आहे. दुसरा उपाय म्हणजे - त्याला मारून टाकायचं. डॉ ब्राऊन म्हणतो आजवर त्याचे खूप हाल झाले तेव्हा त्याला -"

तिचा आणि अश्विनचा चेहरा बघून माझ्या पत्थराच्या हृदयालाही थोडा पाझर फुटला.

अशी बिच्चाऱ्या ल्युसिफरची अगदी ग्रीक ट्रॅजेडी झाली आणि मी तक्रार न करता दोनशे डॉलर्सचं बिल भरलं.

(पूर्वप्रसिद्धी - उत्तमकथा दिवाळी १९८९, एकता जाने १९९०, पशुप्रेमियांच्या दुनियेत स्नेहवर्धन प्रकाशन जून १९९४)